# सृष्टिज्ञान : ५० वर्षांपूर्वी

## (जून १९७३, वर्ष ४६वे, अंक ६, क्रमांक ५४६)

या अंकात सोळा लेख आहेत.

तत्कालीन E.R.D.L. आत्ताची H.E.M.R.L. या संस्थेचे अध्यक्ष डॉ. वा. द. पटवर्धन यांच्या 'स्फोट आणि स्फोटक पदार्थ' या व्याख्यानावरील आधारित लेखास शालिनी भिडे यांनी शोभेची दारू ते लष्करी आतिषबाजीचे बॉम्ब यांसाठी वापरण्यात येणाऱ्या पदार्थात कसकसे बदल झाले आहेत, हे सांगितले आहे. मा. अ. द. ओक यांनी प्रशांतचंद्र महाल्नोबीस या शास्त्रज्ञाच्या कार्याचा ओझरता आढावा घेतला आहे. 'कीटक संग्रह' करा असा गृहपाठ देण्याच्या प्रथेविरुद्ध श्री. दा. रा. केळकर यांनी प्राण्यांवर दया करा या लेखात असे आवाहन शिक्षकांना केले आहे. प्रा. एन. जी. सहस्त्रबुद्धे यांनी निसर्गात मानवी हस्तरोपाचा परिणाम अभ्यासला आहे. चक्रवाढ पद्धतीने व्याज आकारले तर व्याजाची रक्कम प्रचंड वाढेल अशी सर्वसाधारण समजूत असते. परंतु अशा व्याजवाढीला एक निश्चित मर्यादा असते हे संपादक यांच्या लेखाने समजते. यंत्राच्या सहाय्याने अल्पावधीत बोगद्यांच्या अस्तरासाठीची कडी निर्मितीच्या आश्चर्यकारक तंत्राचे वर्णन श्री. रा. वा. सुळे यांच्या लेखात आढळते.

कोंबडीवरील जीवोपयोगी ही सुंदर चित्रकथा चं. ह. पाटील व प्रा. य. बा. राजे यांनी सादर केली आहे. कऱ्हाड येथील सायन्स कॉलेजच्या विज्ञान प्रसारासाठीच्या विविध उपक्रमांची माहिती प्रा. प्र. वि. सोवनी यांनी दिली आहे. यातून कऱ्हाड सायन्स कॉलेजचे वेगळेपण दिसून येते. विद्यार्थांना विज्ञान लेखनासाठी प्रोत्साहन हे त्यातील महत्त्वाचे अंग आहे.

चिंचेची झाड/वृक्ष यांवरील डॉ. ह. चिं. पाटील यांचे लेखात चिंचेची घरगुती व औद्योगिक उपयोगांची माहिती आहे. तसेच औषधी गुणधर्माचे वर्णन आहे. या झाडाची वैशिष्ठये पाहता ते तर नव्या उद्योगांस हातभार लावेल हे नक्की. श्री. य. शां. जोशी यांच्या लेखात समुद्रविज्ञान (ओशनोग्राफी) या नव्याने विकसित होत असलेल्या विज्ञानशाखेची माहिती व या अभ्यासाचे उपयोग दिले असून, भावी काळात या शाखेला महत्व येईल असे भाकित केले आहे ते खरे ठरले आहे.

प्रा. प्र. वि. सोवनी यांच्या 'मानाचा मुजरा' या नेहमीच्या सदरात, ॲव्होगाडो, लॉर्ड केल्व्हिन, बोस, ब्लेझ पास्कल या शास्त्रज्ञांची थोडक्यात ओळख आहे.

पांडा या प्राण्याची माहिती श्री. रमेश महाले यांनी दिली आहे.

नलिनी गुजरकर यांच्या 'जीवोपजीवी' (बांडगूळ) हे निसर्गनिर्मित चक्रय वर्णिले आहे. निरंजन घाटे यांनी नव्याने विकसित होत असलेल्या 'हवाई छायाचित्रे' या ज्ञानशाखेची रंजक कथा सांगितली आहे.

◆

**विज्ञान वार्ताहर**